# BDC LIBRARY

## New Paper Clipping

*A.Y. 2024-2025*

page 4 - 19-1-2025
19 Jan 2025

दैनिक
एकमेव विचारपत्र
महाराष्ट्र न्यूज

https://mahanewsnet.com/ DailyMaharashtraNewsOfficial 8554047000
@DailyMaharashtraNews Maharshtranewslive @Maharashtranew7

# पुस्तकाचा गंध आयुष्याला सुगंधित करतो : चंद्रहार निकम

* महाराष्ट्र न्यूज नेटवर्क

**पाटण, दि. १८ जानेवारी :** पुस्तक वाचत असताना मुखपृष्टापासून ते मलपृष्टा पर्यंत वाचले पाहिजे. समजून घेतले पाहिजे. विद्यार्थी दशेत असताना विद्यार्थ्यांनी वाचले पाहिजे. कारण पुस्तकाचा गंध हा आपल्या आयुष्याला सुगंधित करत असतो असे मत नागोजीराव पाटणकर स्मारक वाचनालयाचे अध्यक्ष चंद्रहार निकम यांनी व्यक्त केले.

बाळासाहेब देसाई कॉलेज, मराठी विभाग व नागोजीराव पाटणकर स्मारक वाचनालय आणि महाराष्ट्र साहित्य परिषद, शाखा पाटण यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित वाचन संकल्प महाराष्ट्राचा या उपक्रमांतर्गत पुस्तक परीक्षण कार्यक्रमात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.



यावेळी अध्यक्षा म्हणून आय.क्यू.ए.सी. समन्वयक डॉ. एच. व्ही.काटे या उपस्थित होत्या तर प्रमुख उपस्थिती म्हणून मराठी विभाग प्रमुख प्रो. डॉ. पांडुरंग ऐवळे , डी. के. देशमुख, डॉ. विनायक राऊत यांची उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला गुलशन सय्यद हिने प्रास्ताविक केले. त्यानंतर मान्यवरांचा स्वागत सत्कार घेण्यात आला. त्यानंतर महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी त्यांनी वाचलेल्या पुस्तकांचे परीक्षण थोडक्यात सांगितले. त्यामध्ये कु. अल्मास मुल्ला, अक्षता मोरे, गुलशन सय्यद, जयश्री भिसे, नाजनीन मुल्ला, सानिका मोळावडे, सुप्रिया देसाई, मिनाज आत्तार या विद्यार्थ्यांनी पुस्तक परिक्षण वाचून दाखविले. चंद्रहार निकम यांनी आपल्या मनोगतात असे म्हणाले की, वाचाल तर वाचाल हा वाक्यप्रचार वाचनाचा महत्वाचा संदेश देतो. वाचन करणे म्हणजे ज्ञान मिळविणे, विचार करायला शिकणे. वाचनाने व्यक्तिमत्व विकास साधता येतो. तसेच वेळेचे व्यवस्थापन याविषयी पोमोडोर या इटालियन टेक्निकची माहिती विद्यार्थ्यांना सांगितली. त्यानंतर अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना डॉ. काटे म्हणाल्या की, वाचनाने विचार प्रगल्भ होतात. वाचन केल्याने मानवाच्या व्यक्तिमत्वाचा अंतर्बाह्य विकास होतो. तसेच त्यांनी साने गुरुजी यांच्या 'श्यामची आई' या पुस्तकातील एक प्रसंग सांगितला. कार्यक्रमाच्या शेवटी बी. ए. ची विद्यार्थिनी अक्षता मोरे हिने आभार मानले तर सूत्रसंचालन जयश्री भिसे हिने केले. सदर पुस्तक परीक्षण कार्यक्रमासाठी प्रा. गायकवाड व प्रा. बळीराम लोहार तसेच विद्यार्थी उपस्थित होते.